**बृहन्मुंबई महानगरपालिका**
सार्वजनिक आरोग्य खाते
कस्तुरबा रुग्णालय
एचओ/ 3291 /केएच दि. 17.07.2025

विषय – सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कस्तुरबा रुग्णालय येथे मानसेवी संवर्गातील विविध पदे कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कस्तुरबा रुग्णालय येथे मानसेवी सहाय्यक क्ष किरण शास्त्रज्ञ १ पद, मानसेवी भिषक ३ पदे, मानसेवी शल्यचिकित्सक १ पद, मानसेवी बालरोग चिकित्सक २ पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी इच्छुक पात्र मानसेवींकडुन खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव, मासिक मानधन व विहीत अटी आणि शर्तीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचा कार्यकाल – दि. १६.०८.२०२५ ते दि. ३१.०३.२०२७
(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)

| पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| मानसेवी सहाय्यक क्ष किरण शास्त्रज्ञ | १ | एम्.डी. (रेडिऑलॉजी) | विषयातील आवश्यक पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री प्राप्त केल्यानंतर उमेदवारास ०२ वर्षाचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे. |
| मानसेवी भिषक | ३ | एम्.डी.( मेडिसिन ) | विषयातील आवश्यक पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री प्राप्त केल्यानंतर उमेदवारास ०२ वर्षाचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे. |
| मानसेवी शल्यचिकित्सक | १ | एम्. एस्.(सर्जरी ) | विषयातील आवश्यक पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री प्राप्त केल्यानंतर उमेदवारास ०२ वर्षाचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे. |
| मानसेवी बालरोग चिकित्सक | २ | एम्.डी. (पेडियॅट्रिक्स) | विषयातील आवश्यक पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री प्राप्त केल्यानंतर उमेदवारास ०२ वर्षाचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे. |

***महत्वाची सूचना –**

एमएस/ एम्.डी. पदवीनंतर १ वर्षापेक्षा जास्त काळ कस्तुरबा रुग्णालयात काम केलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

**अर्ज प्रक्रिया :**

१) अर्जदाराने आपले अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतीसहीत दि. १८.०७.२०२५ ते दि. ३०.०७.२०२५ पर्यंत सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) रूग्णालयाव्या कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

**प्रमाणपत्रे:**

१) एमएस/ एम्.डी. पदवी उत्तीर्ण व प्रयत्न प्रमाणपत्र

२) एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र

३) अनुभव प्रमाणपत्र

४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत

५) प्रोफेशनल इंडेनमिटी (Professional Indemnity) प्रत

वेतन: परिपत्रक संचालक/वे. शि.प्र.रु./८२३३ दिनांक २५.०३.२०१४ नुसार दरमहा रु. १०,०००/.

**<u>सर्व साधारण अटी व शर्ती -</u>**

१) सुट्टीचा दिवस आणि रविवार वगळता नियुक्त केलेल्या दिवसांनुसार मानसेवी तज्ञ यांनी आठवड्यातून ५ दिवस ४. तास काम करावे लागेल, सुट्टीचा दिवस रुग्णालय प्रमुख ठरवतील.

२) नियुक्त मानसेवी तज्ञ कस्तुरबा रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रियागार विभाग आणि आंतर रुग्ण विभागात रुग्णांवर उपचार देतील.

३) मानसेवी तज्ञ हे रुग्णालयातील आवास अधिकारी व वरिष्ठ निवासी अधिकारी यांना प्रशिक्षण देतील.

४) युनिट अंतर्गत होणारे सर्व उपचार व शस्त्रक्रिया यासाठी सर्वस्वी जबाबदारी मानसेवी तज्ञांची राहतील.

५) मानसेवी तज्ञ यांनी त्यांच्या कर्तव्याच्या दिवशी हजेरी पत्रावर स्वाक्षरी करावी लागेल,

६) मानधन शुल्काचे पेमेंट संचालक/वे. शि.प्र.रु./८२३३ दि. २५.०३.२०१४ च्या परिपत्रकानुसार केले जाईल.

७) मानसेवी तज्ञ त्यांच्या सेवेच्या कालावधीत नैमित्तीक रजा अनूज्ञ नाही.

८) मानसेवी तनची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन नियुक्ती करण्यात येईल.

९) नियुक्त झालेला मानसेवी तज्ञ एकापेक्षा जास्त बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयाच्या पदांवर राहू शकत नाही.

१०) सदर पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही. तसेच महानगरपालिका नियमित कर्मचा-यांना लागू होणारै बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमन लागू होणार नाहीत आणि त्यासाठी ते न्यायालयात जाऊ शकत नाहीत.

११) कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

१२) नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच कामगिरी असमाधानकारक आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१३) नियुक्तीच्या वेळी ५०० रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करून संबंधीत आस्थापनेस सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१४) मानसेवी तज्ञाला कुठल्याही कारणास्तव पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

- -सही - -
वैद्यकीय अधिक्षक
कस्तुरबा रुग्णालय